Mothers name

Estb/Gen-15/2005-2006/

April 7, 2005

**CIRCULAR:**

Sub: To include the name of the mother along with father's name in the application forms (while taking admission in the college) Mark-lists, Degrees and other documents of the candidates

Ref. (1) Circular No. 1098/Pr.Kra.325/Ka-2 dated 30.11.1999 of Mahila and Balvikas Division

(2) G.R. No. PRE- 1099/(2221)/Prashi-1, dated 5.2.2000 of Govt. of Maharashtra.

Sir/Madam,

We have enclosed a copy of G.R. No. 1103/(173/03)/Vishi-2 dated 11.3.2005 issued by the Government of Maharashtra, Higher and Technical Education Department, Mantralaya Annexe, Mumbai, on the subject cited above, which is self-explanatory, for your information and necessary action in the matter.

As per the above G.R. you are requested to note that it is compulsory to include the name of the mother along with father's name in the prescribed application forms (while taking admission), Mark-lists, Degrees, and other documents of the candidates.

( KISHOR G. BHIDE )
REGISTRAR

To

1. All the Principals of the Colleges conducted by this University.
2. All Directors/Heads/Co-ordinators/In-Charge of the Departments of the University.
3. The Controller of Examination.
4. The Director, B.C.U.D.
5. The In-Charge Finance & Accounts Officer
6. All Deputy Registrar
7. All Asstt. Registrars, Mumbai & Juhu Campuses.
8. The University Librarian
9. The Hostel Superintendent at Mumbai & Juhu Campuses.
10. The Office of V.C./Registrar – for inf.
11. The Inquiry Clerk.

Encl: As above.

Jk/-

Cc to: (1) The Deputy Registrar, Affiliation – w.r. to circulate amongst the affiliated colleges of this University.

(2) Notice Board

(3) Master file.

विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयात प्रवेश
घेतेवेळी नोंदवहीमध्ये व संबंधित इतर कागदपत्रांवर
विद्यार्थ्यांच्या वडिलांच्या नांवाबरोबर आईच्या
नावाची नोंद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

शासन निर्णय क्र. संकिर्ण-११०३/(१७३/०३)/विशि-२

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२.

दिनांक:- ११ मार्च, २००५.

S.N.D.T. W. UNIVERSITY
MUMBAI-20
21 MAR 2005
1821B

वाचा :- १) महिला व बालविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०९८/प्र.क्र.३२५/का-२, दिनांक ३० नोव्हेंबर, १९९९

२) शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. पीआरई १०९९/(२२२१)प्राशि - १, दिनांक ५ फेब्रुवारी. २०००.

प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक [illegible] - ०६९५ /स्टेट ३ /पोल -१३, दिनांक २४ जून १९९६ अन्वये अप्पर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कृती दलाच्या दिनांक २३ सप्टेंबर, १९९९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांपैकी एक निर्णय असा आहे की, शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, जन्म-मृत्यु नोंदणी, शिधावाटप पत्रिका, रोजगार विनिमय केंद्रात नोंदणी, लोकसेवा आयोगाच्या परिक्षा इत्यादी बाबतच्या आवेदन पत्रावर तसेच अन्य शासकीय निमशासकीय कागदपत्रावर अभिलेखावर वडिलांच्या नावाचा स्तंभ असतो आणि त्यात संबंधितांच्या वडिलांचे नाव नमूद करावयाचे असते. अशा प्रकारच्या सर्व आवेदन पत्रावर कागदपत्रावर अभिलेखावर संबंधितांच्या वडिलांच्या नावाच्या स्तंभा बरोबरच संबंधितांच्या आईच्या नावाचा स्तंभ [illegible] यावा आणि त्यामध्ये संबंधितांच्या वडिलांच्या नावा बरोबरच आईचे ही नाव नमूद करण्याचे बंधनकारक करावे. सदर निर्णय महिला व बालविकास विभागाने संदर्भाधीन दिनांक ३० नोव्हेंबर, १९९९ च्या परिपत्रकान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या निदर्शनास आणला असून त्यांची अंमलबजावणी करण्याचे सुचित केले आहे. सदर परिपत्रकानुसार शालेय शिक्षण विभागाने सुध्दा संदर्भाधीन दिनांक ५ फेब्रुवारी, २००० च्या शासन निर्णयानुसार आदेश निर्गमित केले आहेत. शालेय शिक्षण विभागाने प्राथमिक शाळेतील प्रवेशाच्यावेळी तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये वडिलांच्या नावासह आईच्या नावाची नोंद घेण्यात यावी

असे आदेश दिले आहेत . त्यानुसार या विभागाच्या संबंधित अकृषि विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित सर्व महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यांना पुढील प्रमाणे शासन निर्णय लागू करण्यात येत आहे .

**शासन निर्णय:-** उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील विद्यापीठे अभिमत विद्यापीठे, संशोधन संस्था व त्यास संलग्नित महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयातील / विद्यापीठातील जनरल रजिस्टरमध्ये . प्रवेश फॉर्मवर सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांचे पूर्ण नांव , जात व पोटजात , जन्मस्थान, जन्मतारीख अशा अनेक नोंदी घेतल्या जातात. तथापि यात आईचे नांव नोंदविण्यात येत नाही. या शासन निर्णयानुसार आदेशित करण्यात येते की , यापुढे विद्यापीठे व त्यास संलग्नित महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतांना ज्या-ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या नावासोबत वडिलांचे नाव लिहिले जाते. त्या प्रत्येक ठिकाणी त्या विद्यार्थ्यांच्या वडिलांच्या नावाच्या पुढे आईच्या नावाची नोंद करण्यात यावी . तसेच विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र यावर सुध्दा संपूर्ण नावामध्ये वडिलांचे नावानंतर आईचे नावाचा उल्लेख करण्यात यावा. त्याच बरोबर महाविद्यालय/शैक्षणिक संस्था सोडल्याच्या दाखल्यामध्ये सुध्दा वडिलांच्या नावा बरोबरच आईच्या नावाचा रकाना ठेवण्यात यावा व त्यामध्ये नोंद घेण्यात यावी .

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

( सी . न. चित्रे )
उपसचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक , उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे .
२. सर्व विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.
३. सर्व विद्यापीठांचे कुलसचिव .
४. सर्व मंत्रालयीन विभाग .
५. विभागातील सर्व कार्यासने.
६. निवड नस्ती . विशि-२ कार्यासन